# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 25.03.2026** **वार- बुधवार**

---

**<u>मंडपम</u>**

पुणे महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत लोहगाव इथं प्रस्तावित भारत मंडपम प्रकल्पाला बहुमतानं मान्यता देण्यात आली. या प्रकल्पामुळं पुण्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचं कन्व्हेन्शन सेंटर उभं राहणार असून मोठ्या परिषदा, प्रदर्शन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना चालना मिळणार आहे.

**<u>निबंधक</u>**

पिंपरी-चिंचवड शहराचा वाढता विस्तार आणि मालमत्ता व्यवहारांची मोठी संख्या लक्षात घेता, शहरासाठी स्वतंत्र 'सह जिल्हा निबंधक, वर्ग-1 तथा मुद्रांक जिल्हाधिकारी' कार्यालय सुरू होणार आहे. चिंचवडमधील नागरिकांना आजही पुण्यातील मुद्रांक शुल्क विभागाच्या मुख्य कार्यालयावर अवलंबून राहावं लागतं. हवेली तालुक्यातील अनेक दुय्यम निबंधक कार्यालयं पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीत असली, तरी त्यांचं नियंत्रण पुणे शहरातून होतं, त्यामुळं स्वतंत्र निबंधक कार्यालयाची गरज आहे.

**<u>जर्नल</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात जर्नल ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंट थॉट्स या शोधनिबंधपर त्रैमासिक पत्रिकेचं प्रकाशन प्र-कुलगुरू प्राध्यापक डॉक्टर पराग काळकर यांच्या हस्ते करण्यात आलं. यावेळी बोलताना डॉक्टर काळकर यांनी वाणिज्य आणि व्यवस्थापन क्षेत्रातील संशोधनाचं महत्त्व अधोरेखित केलं. जर्नलच्या या आवृत्तीमध्ये मुख्यत्वे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या परिणामांच्या अभ्यासावर आधारित संशोधनपर लेखांचा समावेश आहे. विविध आंतरविद्याशाखीय 14 विषयांवरील संशोधन निबंध प्रकाशित करण्यात आले आहेत अशी माहिती संपादक प्राचार्य डॉक्टर प्रसन्न देशमुख यांनी दिली.

**<u>महोत्सव</u>**

यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इस्न्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्समध्ये 'यशोफेस्ट' हा आंतरमहाविद्यालयीन व्यवस्थापन आणि तांत्रिक महोत्सव नुकताच साजरा झाला. तीसपेक्षा जास्त महाविद्यालयांमधील एमबीए, एमसीए आणि इतर विद्याशाखांच्या अडीचशेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी विविध सर्जनशील आणि नाविन्यपूर्ण कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला. सर्जनशीलता, सादरीकरण, नाविन्यता आणि समस्या-निवारण कौशल्यांच्या आधारावर तज्ञ आणि प्राध्यापकांकडून या स्पर्धांचं परीक्षण करण्यात आलं. नंदन ग्रुपचे प्रमुख मनुष्यबळ व्यवस्थापन अधिकारी मंगेश कुलकर्णी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिकं प्रदान करण्यात आली.

**<u>पतित</u>**

भगतसिंह, सुखदेव आणि राजगुरू यांच्यासह इतर क्रांतिकारकांच्या विचारांचा आदर्श घेऊन राष्ट्रसेवेचं व्रत तरुण पिढीने जपावं, राष्ट्राच्या उभारणीमध्ये चांगलं योगदान द्यावं असं आवाहन ज्येष्ठ नगरसेविका मंजुश्री खर्डेकर यांनी आज पुण्यात केलं. पतित पावन संघटनेच्या वतीनं शहीद दिनानिमित्त सरदार भगतसिंह, सुखदेव आणि राजगुरू या क्रांतिकारकांना अभिवादन करण्याच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

**अर्थसंकल्प**

सशक्त महिला- सक्षम समाज या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवूनपुणे मनपाचे स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी 2026-27 च्या अंदाजपत्रकात विविध उपक्रमांची घोषणा केली आहे. महिलांच्या मालकी हक्काला प्रोत्साहन देण्यासाठी 31 मार्चपर्यंत 500 चौरस फुटांपर्यंतच्या महिलांच्या नावावरील मिळकतींना 50 टक्के मिळकत करमाफी देण्यात येईल. महिलांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी स्वतंत्र कन्व्हेन्शन सेंटर उभारुन महिला उद्योजक, बचत गट आणि विविध क्षेत्रातील महिलांसाठी प्रशिक्षण, कार्यशाळा, प्रदर्शन आणि संवाद कार्यक्रम आयोजित करण्यासाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील.

**श्री रामनवमी**

श्री रामनवमी निमित्त आळंदी इथं श्री संत ज्ञानेश्वर माऊली देवस्थानाच्या वतीनं शिंदेशाही चंदन उटी सोहळ्याचं आयोजन उद्या दुपारी तीन वाजता करण्यात आलं आहे. सोहळ्यानिमित्त श्रीमंत महादजी महाराजांच्या प्रतिमेचं पूजन करण्यात येणार असून, त्यांच्या आळंदी देवस्थानावरील योगदानावर आधारित व्याख्यानमालेचं आयोजन देखील करण्यात आलं आहे.

**शोभायात्रा**

अखिल रामनवमी उत्सव समिती, ट्रस्ट पुणे यांच्या वतीनं श्रीराम नवमीनिमित्त भव्य शोभायात्रेचं उद्या संध्याकाळी सात ते दहा या वेळेत आयोजन केलं आहे. प्रभू श्रीरामांची भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे अशी माहिती निमंत्रक अमर भालेराव यांनी दिली.

**गूंज**

आपण ज्या मातीत जन्माला त्या मातीचा आपल्याला अभिमान वाटला पाहिजे असं प्रतिपादन लष्कराचे माजी असिस्टंट कमांडन्ट गुंजन खलाणे यांनी काल पुण्यात केलं. माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी माध्यमिक विद्यालयात आयोजित 'गूंज' द साउंड ऑफ भारत" या कार्यक्रमात ते बोलत होते. देशभक्तीपर गीतं तसंच लष्करातील आपल्या आणि सहकाऱ्यांच्या अनुभवातून खलाणे यांनी विद्यार्थ्यांच्या मनात देशासाठी करता येणाऱ्या गोष्टी सांगितल्या आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरं दिली. ज्येष्ठ संगीतकार जीवन धर्माधिकारी, शाळा समिती अध्यक्ष मिलिंद कांबळे, मुख्याध्यापिका वासंती बनकर आदी याप्रसंगी उपस्थित होते.

**आरोग्य**

पुणे महापालिकेच्या अंदाजपत्रकात वैद्यकीय सेवांचं सक्षमीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामध्ये कमला नेहरू आणि अण्णासाहेब मगर रुग्णालयातील आरोग्य सेवांचं विस्तारीकरण आणि अद्ययावतीकरण करण्यात येणार आहे. नायडू रुग्णालय परिसरात विद्यार्थी वसतिगृह आणि कर्मचारी निवासासाठी 14 मजली इमारत उभारण्यात येणार आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या कमाल 36 तर किमान 18 अंश सेल्सियस तापमान राहण्याचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**